Sulochana Belhekar Samajik Va Bahu Uddieshiya Shikshan Santha

Sant Dnyaneshwar B.Ed. College

NCTE Code No. APW05389/123665, (Marathi Medium)

Affiliated to Savitribai Phule Pune University PU/AN/B. Ed.097/2008

Email- sdbedcollege@rediffmail.com; Web: www.sdbednewasa.com

Bhanashiware, Tal: Newasa, Dist: Ahmednagar (Maharashtra) 414609; Phone/Fax- (02427) 297099

# 2.4.7. Sample Assignment Book

# शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम

## बी.एड.द्वितीय वर्ष २०१८ ते २०१९

## B.Ed. 2nd Year - 2018 2019

सुलोचना बेल्हेकर सामाजिक व बहुउद्देशिय शिक्षण संस्था

# संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय

भानसहिवरा,(नेवासाफाटा),ता.नेवासा,
जि.अहमदनगर

**211**

Course :- 20 211 B.ed.

Name of Subject :- Drama & art in education

Practical work I) Visit to art gallary.
II) Report of Interview

छात्र अध्यापकाचे संपूर्ण नांव :- सालुंके नेहा विजय.

मार्गदर्शक प्राध्यपकाचे नांव : प्रा. साळवे. एस. ए.

हजेरी क्रमांक : ४६

Ganesh Satpute,Mob : 9834808182

Scanned with OKEN Scanner

**S.B.S.B.S.S.**

**Sant Dnyaneshwer B.Ed College Bhanashivre,Newasa.**

**Evaluation Chart**

**Activity – Practical 2018-19**

Subject Name: - Drama and Art in Education

Practical No–1. Visit to art gallery 211

Name of the Student: - Salunke Neha Vijay Roll. No. 46

Rating Scale 1) Unsatisfactory 2) Average 3) Satisfactory4) Good 5) Excellent.

| No. | Criteria | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Introduction | | | | ✓ | |
| 2 | Objectives of the visit | | | | ✓ | |
| 3 | Selection of place for visit | | | | | ✓ |
| 4 | Planning of Visit | | | | | ✓ |
| 5 | Theme of the Gallery | | | | ✓ | |
| 6 | Information about the artist | | | | ✓ | |
| 7 | Actual experiences of the visit | | | ✓ | | |
| 8 | Aesthetic values reflected in the gallery | | | ✓ | | |
| 9 | Edutainment through the visit | | | | ✓ | |
| 10 | Overall impression of the report | | | | ✓ | |
| | Total Marks-50 | | | | 40 | |

Assitant Professor Incharge

Scanned with OKEN Scanner

संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मानसहिवरा

२०१८-१९

२११

Drama and Art in Education.

Practical No-1

Visit to art gallary.

मार्गदर्शक प्राध्यापक = प्रा. साळवे. एस. ए.

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका

| अ.नं. | घटकाचे नाव | सही |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | |
| २) | भेटीचे उद्दिष्टे | |
| ३) | स्थळाची निवड व वेळ | |
| ४) | नियोजन | |
| ५) | भेटीचे अनुभव | |
| ६) | कलादालनाची मध्यवर्ती कल्पना | |
| ७) | कलाकाराविषयीची माहिती | |
| ८) | कलाकारातून व्यक्त झालेली सौंदर्य मूल्य / सौंदर्यशास्त्र | |
| ९) | मनोरंजनातून शिक्षण | |
| १०) | अभिप्राय | |

# प्रस्तावना

पुणे विद्यापिठअंतर्गत असणाऱ्या (बी. एड.) संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मानसहिवरा यामध्ये अभ्यासक्रमात असणाऱ्या प्रात्यक्षिक क्रमांक २११ साठी आम्ही एका छान Art Gallery ला भेट दिली.

या प्रात्यक्षिकातून आम्हाला वेगवेगळ्या कलेचे नमुने पहावयास मिळाले. प्रत्येक व्यक्तिजवळ काहीतरी गुण कौशल्ये असतात. फक्त त्यांना आयुष्यात चालना मिळायला हवी आम्ही ज्या Art Gallery ला भेट दिली त्यांनी आपला छंद तर जोपासलाच शिवाय उपजिवीकेचे साधन सुद्धा त्यातून उपलब्ध झाले.

विद्यार्थ्यांच्या सहजप्रवृत्तीला अधिकाधीक चालना मिळाली. सर्वांगीण विकास व्हावा त्यांच्यातील सर्जनशीलता विकसीत होवून नवनिर्मीतीचे ज्ञान आत्मसाद करता येईल असा हा आनंददायी ठरणारा कलात्मक सौंदर्यदृष्टीने ज्ञान देणारे चित्र- हस्तकला हा भाग महत्वपूर्ण ठरणार आहे.

# भेटीचे उद्दिष्टे

(१) छात्रअध्यापकास शालेय विद्यार्थ्यांमध्ये कलेचे महत्व समजुन देणे.

(२) छात्रअध्यापकास शालेय विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगिण विकास साधण्यास मदत करणे.

(३) छात्राध्यापकास शालेय विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेचा विकास साधण्यास मदत करणे.

(४) भावनिक बुद्धीमत्तेचे ज्ञान अवगत करणे.

(५) केलेल्या विकासातून स्वावलंबन रुजविण्यास मदत करणे.

(६) छात्राध्यापकांनी कला दालनातून लहान उद्योगाला चालना देणे.

(७) छात्रअध्यापकास शालेय विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व शोधक वृत्ती ही नवनिर्मितीची कल्पना वाढविण्यास मदत करणे.

# स्थळाची निवड व वेळ

पुणे विद्यापीठांतर्गत बी. एड. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक क्र. २११ च्या प्रात्यक्षिकासाठी visit to art Gallery हे प्रात्यक्षिक निवडले आहे. यामध्ये एका कलादालनाला भेट दिली या कलादालनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील कला दालन इंटरनॅशनल चा शोध घेतला. त्यातून 'अशोका आर्ट गॅलरी' ची निवड केली. या निवडीचे कारण -

(१) अमेरीका येथील कपाल आश्रमात व्यक्तिचित्रे प्रदर्शन.

(२) दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक येथील कपाल आश्रमात चित्रे प्रदर्शित.

(३) खडू, शिल्प, वेगळे कोरिव काम हे लिमका बुक ऑफ रेकॉर्ड साठी प्रविशिका सामाविष्ठ.

(४) विविध पुरस्कार आणि पारितोषिके मिळाल्यामुळे या आर्ट गॅलरिची निवड केली.

Scanned with OKEN Scanner

# नियोजन

इंटरनेटवर अहमदनगर जिल्ह्यामधील विविध आर्ट गॅलरीचा शोध घेतल्यानंतर 'अशोका आर्ट गॅलरी' ची निवड करण्यात आली.

त्यानुसार २८/१२/२०१८ रोजी प्रा. गव्हाणे एस.एन. व प्रा. भोईटे एम.ई. यांनी अहमदनगर येथील 'अशोका आर्ट गॅलरी' या ठिकाणी भेटण्याची वेळ ठरविली. तसेच महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवरही तारीख व वेळ लिहिण्यात आली. आणि या आर्ट गॅलरी विषयी माहिती जोडण्यात आली.

ठरलेल्या वेळेनुसार महाविद्यालयाच्या बस मधून आर्ट गॅलरीला भेट देण्यात आली. या भेटीसाठी गॅलरीत विविध गोष्टींचे, चित्रांचे फोटो काढण्यात आले. पुर्व नियोजनाप्रमाणे विविध गोष्टींचे निरिक्षण व नोंदी करण्यात आल्या.

Scanned with OKEN Scanner

सदर कलादालनाला - 'अशोका आर्ट गॅलरी', स भेट दिल्यामुळे मला जे अनुभव मिळाले ते अतिशय अवर्णनिय आहे. एक व्यक्ती म्हणून माझी सौंदर्यदृष्टी व सौंदर्य विषयक कल्पनांचा विकास झाला. चित्र, हस्तकला या भागांचा अध्ययन अनुभवातून खुप काही शिकण्यास मिळाले. नवनविन अनुभुतींचा अविष्कार या विषयातून पहायला मिळाला.

एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या सहज प्रवृत्तीला चालना देण्याचे कौशल्य आत्मसात केले. अध्यापन अध्यापनात नवनविन कल्पना वापरण्याचे कौशल्य आत्मसाद झाले. कलाकृती निर्माण करणे त्याचा उपयोग करुन घेणे. त्यातील रंगांबरोबर आकार आकलन वाढवणे. या गोष्टींचा विचार करण्याची प्रेरणा मिळाली. चित्र हस्तकलेचे ज्ञान शिक्षकाने व छात्राध्यापकाने आत्मसाद केले आणि ते किती आवश्यक आहे याचे ज्ञान मिळाले.

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

# लादालनाची मध्यवर्ती कल्पना

प्रस्तुत आर्ट गॅलरीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आलेले आहे - व्यक्तिचित्रे
खडू शिल्प
वारली चित्रकला.

प्रत्यक्षात जेव्हा आर्ट गॅलरीला भेट दिली तो अनुभव अगदी वेगळाच होता. तेथे आम्हाला मा. चित्रकार अशोक डोळसे भेटले त्यांनी आम्हाला त्यांच्या चित्रकलेचा छंद कसा लागला, प्रेरणा कोठून व कशी मिळाली ते सांगितले.

आर्ट गॅलरीत प्रवेश केल्यानंतर आम्हाला विविध पेंटिंग दिसल्या. मी यापूर्वी अशा पेंटिंग कधीही पाहिल्या नव्हत्या तेथे श्री साई बाबा, विठ्ठल रुक्मिणी, वारली चित्रे, मधुबनी तसेच कॅन्व्हास पेंटिंग, निसर्ग चित्रे, पेन्सील चित्रे, रिअलसीक पेंटींग अशी खूप प्रमाणित चित्रे पाहिली.

डोळसे सरांनी आम्हाला चित्रकले-बद्दल बरेच माहिती सांगितली. पेंटिंगसाठी कोणकोणते साहित्य लागते, विविध नंबरचे ब्रश, कलर, स्टँड, आणि मुख्य म्हणजे एकाग्रता आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

तेथील काही चित्रे भावनाप्रधान आहे तर काही रंगप्रधान आहेत. आणि विशेष म्हणजे आपण आपल्या शाळेत जो खडू लिहिण्यासाठी वापरतो त्यावर केलेले बारिक कोरीव काम थक्क करणारे आहे.

अहमदनगर येथील या आर्ट गॅलरी ला आजपर्यंत अनेक लोकांनी भेटी दिलेल्या असून विविध पुरस्कार देखील प्राप्त झालेले आहेत. त्यांना कलारत्न पुरस्कार, आदर्श कला शिक्षक पुरस्कार, इ. पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

या आर्ट गॅलरीमधून अशी प्रेरणा मिळाली की आपण आपले छंद व आवड यांना दाबून ठेवू नये तर त्यांचे उच्चाटन करावे. प्रत्येकाच्या अंगी विविध गुण वसलेले असतात फक्त त्यांना ओळखावे.

अशा भेटीतून आपल्याला विद्यार्थी-मध्ये नैतिकता, देशप्रेम, कल्पकता, रंजकता, निटनेटकेपणा अशा विविध मूल्ये रुजवितात. त्यांच्या या चित्रकलेतून मला भारतातील विविध संस्कृतींचे दर्शन घडले.

Scanned with OKEN Scanner

# कलाकाराविषयीची माहिती

- नाव = अशोक बाबुराव डोळस
- जन्म तारिख = २ जुन १९७२
- शिक्षण = ए. टी. डी. एम. ए. (आर्ट मास्टर) जिल्ह्यात सर्वप्रथम
- पत्ता = कलानिकेतन, तांगे गल्ली, अ. नगर
- कला शिक्षक = सीताराम सारडा विद्यालय, अहमदनगर.
- आवडता विषय = पोट्रेट (व्यक्तिचित्रे)

- संग्रहित चित्रे =
  1) अमेरिका येथील कृपाल आश्रमात व्यक्तिचित्रे
  2) दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, येथील कृपाल आश्रमात व्यक्तिचित्रे.
  3) अहमदनगर महानगरपालिका कौन्सीलहॉल
  4) कर्नाटक, पुणे येथील शंकराचार्य आश्रम
  5) शद्धाकृष्ण सेवा समिती
  6) हिंदी सेवा मंडळ

- पुरस्कार =
  1) कलारत्न पुरस्कार
  2) आदर्श कलाशिक्षक पुरस्कार
  3) विविध चित्रकला स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकाची बक्षिसे.

# कलादालनातून व्यतीत झालेली सौंदर्य मूल्य व सौंदर्यशास्त्र

## खडु शिल्प आणि चित्रे

फळ्यावर लिहिण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या डिस्टुल खडुवर टाचणीच्या सहाय्याने राष्ट्रीय, धार्मिक, राजकिय, आदर्श थोर व्यक्तींची व्यक्तिचित्रे बनविलेली आहेत.

खडुशिल्प एक अनोखी शिल्पकार या विषयावर दुरदर्शनच्या राष्ट्रीय व सह्याद्री वाहिनी, मी मराठी, स्टार टी.व्ही., महानगर न्युज, सहारा, झी. टी.व्ही. वर मुलाखत व चौदा वेळा पुर्नप्रक्षेपण.

* चित्रे व खडुशिल्पे प्रदर्शन *

* संत श्री. रवींद्रसिंहजी महाराज यांच्या जीवनावर आधारित तैल चित्र प्रदर्शन १९९४-९५.

* प्रथम खडुशिल्प प्रदर्शन २००८-०९ नगर

* द्वितीय खडुशिल्प व चित्र प्रदर्शन २०१०-११.

* तृतीय खडुशिल्प व चित्र प्रदर्शन २०१०-११ सेनापती बापट स्मारक पारनेर, अहमदनगर.

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

# व्यक्ति चित्रे

वेगवेगळे व्यक्तीचित्रे अतिशय सुबक व हुबेहुब काढली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आशा भोसले यांचे व्यक्तीचित्र मला फार आवडले. तसेच राजस्थानी वेशभुषा असलेले नऊवारी साडीमधील पुजा करणारी स्त्री इ. चित्रे फारच आकर्षक होती.

# वारली व मधूबनी चित्रे

वारली चित्रे आपल्याकडे आदिवासी भागात बहुतेक ठिकाणी त्यांच्या भिंतीवर दिसतात. त्यांनी हुबेहुब अगदी तसेच वरली चित्रे काढली होती. चित्रकलेचे अजूनही खास वैशिष्ट्ये म्हणजे मधुबनी चित्रे यामध्ये जुन्या काळी स्त्री, तिच्या अंगाव-रील दागिने इ. यांची अगदी प्रतिकृती काढली आहे.

Scanned with OKEN Scanner

# मनोरंजनातून शिक्षण

सदर भेटीतुन मनोरंजनातुन शिक्षण झाले. कलेचा, सौंदर्याचा आस्वाद घेताना खुप आनंद झाला. त्यातुनच कल्पकता, नवनिर्मिती कौशल्याचा एकत्रीकरणातून सौंदर्यपूर्ण व उपयुक्त कलाकृती निर्माण करण्याचे कौशल्य विकसीत करण्याची मदत झाली. मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आविष्कारास चालना देण्याची क्षमता प्राप्त झाली.

अध्यापनाच्या विविध पद्धतींची जाणिव झाली. विद्यार्थ्यांची सर्जनशिलता विकसित करण्यासाठी आवश्यक क्षमतांची जाणिव झाली. आनंददायी शिक्षणाला वळण देण्याचे सामर्थ्य चित्रकलेत आहे. मानवी जिवन ही एक कला आहे. कलेशिवाय जीवनच व्यर्थ आहे. म्हणून कलेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही कलेतूनच सहज विकास वैयक्तिक प्रकटीकरणाला व भावनाविष्काराला वाव मिळतो.

# अभिप्राय

प्रात्यक्षिक कार्य क्र. २११ मध्ये आम्ही 'अशोका आर्ट गॅलरी' ला भेट दिली. या कोर्सच्या माध्यमातून स्वतःच्या अंगात असणाऱ्या कलागुणांची जाणीव झाली. आपल्या स्वतःतील कौशल्य विकसीत करण्यासाठी हे प्रात्यक्षिक उपयुक्त आहे.

चित्र हस्तकला हा विषय सर्जनशिलतेला वाव देणारा आहे. सर्वांगिण विकासासाठी शिक्षण क्षेत्रात अनन्यसाधारण असे महत्व आहे. शिक्षण म्हणजे व्यक्तीचा शारिरीक, मानसिक व बौद्धिक विकास होय. या विकास प्रक्रियेत स्व-प्रकटीकरण आणि आस्वादासाठी विशेष महत्व आहे.

कला दालनाला भेट दिल्यामुळे, कलाप्रवृत्ती कलानिर्मितीची क्षमता, अभिरुची कामाच्या रस, कलात्मक दृष्टीकोनाचा विकास होण्यास मदत होईल. मानवी जीवन हे कलेच्या योगानेच समृद्ध बनले म्हणून कलेला राज मान्यता, मानवी जीवनाचा समतोल साधण्यास मदत मिळाली आहे.

art gallery

अशोका आर्ट गॅलरी.

एकदा अवश्य भेट द्यावे असे कलादालन

प्राचार्य,
सर्व प्राध्यापक वृंद
व प्रशिक्षणार्थी शिक्षक विद्यार्थी

आपण आज आमच्या अशोका आर्ट गॅलरीला भेट दिली. गॅलरीतील वस्तुशिल्प, चित्राकृतींचे अभ्यासात्मक अवलोकन केले. चित्र प्रदर्शनातील मध्ये रुची दर्शविलेली पाहून आम्हाला मनस्वी आनंद होतो.

आपली कलाप्रियता अशीच वृद्धिंगत होवो या शुभेच्छासह.

# संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भानसहिवरा

२०१८-१९

२११

## Drama and Art in Education

## Practical No-2

## Report of Interview

छात्र अध्यापकाचे नांव = साळुंके नेहा विजय

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटकाचे नाव | सही |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | |
| २) | उद्दिष्टे | |
| ३) | मुलाखतीची निवड | |
| ४) | मुलाखतीचे नियोजन | |
| ५) | मुलाखतीची कार्यवाही | |
| ६) | कुंभाराने मुलाखतीस दिलेला प्रतिसाद | |
| ७) | कुंभाराची वैशिष्ट्ये / शैली | |
| ८) | कुंभाराचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | |
| ९) | मुलाखतीचा अन्वयार्थ | |
| १०) | अभिप्राय | |


Scanned with OKEN Scanner

# प्रस्तावना

पुणे विद्यापिठांतर्गत असणाऱ्या (बी.एड.) संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मानसहिवरा यामध्ये असणाऱ्या अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक क्र. २०११ साठी मी एका चित्रकलेत प्राविण्य प्राप्त असणाऱ्या कलाकाराची मुलाखत घेतली.

या मुलाखतीतून मला चित्रकलेचे महत्व, तत्व आणि चित्रकलेची ओळख झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी परिचीत माध्यमापेक्षा वेगवेगळ्या माध्यमांचा व प्रयोगांचा वापर केला तर शिक्षकाला अध्यापनात वैविध्यता आणता येईल तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशिलतेला वाव मिळेल.

कलाकाराच्या या मुलाखतीतून कलाप्रवृत्ती, कलानिर्मितीची क्षमता, अभिरूची, कामाचा रस, कलात्मक दृष्टीकोनाचा विकास, चित्रकलेचा भावी जीवनात होणारा उपयोग समजण्यास नक्कीच मदत होईल.

# उद्दिष्टे

१) कलेतून विद्यार्थ्यांचा नैतिक विकास साधण्यास छात्राध्यापकाला मदत होणे

२) विद्यार्थ्याला नवनविन कलेची ओळख आणि महत्व पटवून देण्यास उपयुक्त

३) शाळेतील विविध उपक्रम नवनविन कल्पनांच्या माध्यमातून साकारणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये सुबक काम करण्याची सवय रुजवणे

५) शिक्षकांनी विविध उपक्रम व अध्यापन पद्धती अवलंबून अध्यापन अधिक परिणामकारक बनविणे.

६) विद्यार्थ्यांतील कल्पकता आणि शोधक वृत्तींचा विकास साधणे.

७) छात्राध्यापकांना कला दालनातून भावनिक बुद्धिमत्तेचे ज्ञान अवगत करणे

८) छात्रअध्यापकास शालेय विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास साधण्यास मदत करणे.

# मुलाखतीची निवड

पुणे विद्यापीठअंतर्गत बी.एड. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक क्रमांक २११ च्या प्रात्यक्षिकासाठी Report of Interview हे प्रात्यक्षिक निवडले आहे.

यामध्ये श्रीरामपूर तालुक्यातील एका कलादालनाला भेट दिली. प्रशस्त आणि अफलातून व्यंगचित्रांचा संग्रह असणारे हे 'रंगलहरी कलादालन' आहे. यामध्ये शंभर, दोनशे नव्हे तर दोन हजारांहून अधिक व्यंगचित्रांचा संग्रह श्रीरामपूर येथील 'श्री रवी भागवत' यांनी केला आहे.

बऱ्याच लोकांना कशाचा न कशाचा तरी छंद असतो. काही लोक त्यांचा छंद संग्रहाच्या रुपाने जोपासत असतात. यामागील उद्देश हाच असतो की, नवीन पिढीने यातून प्रेरणा घ्यावी. रवी भागवत यांनी असाच अफलातून व्यंगचित्रांचा संग्रह केला आहे. त्यांची काही व्यंगचित्रे पाहिली की चेहऱ्यावर हास्याची लकेर येतेच.

अशाप्रकारे चित्रकारितेतून व्यंगचित्रकारितेकडे... हा प्रवास जाणून घेण्यासाठी मी रवी भागवत यांच्या मुलाखतीची निवड केली.

Scanned with OKEN Scanner

# मुलाखतीचे नियोजन

मी सालुंके नेहा विजय बी.एड २ वर्ष, पुणे विद्यापीठ अंतर्गत श्री संत ज्ञानेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भानसहिवरा मध्ये अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक क्रमांक २११ च्या प्रात्यक्षिकासाठी Report of Interview हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी, श्रीरामपूर येथील प्रसिद्ध चित्रकार रवी भागवत यांची चित्रकारितेतून व्यंगचित्रकारीतेकडे या विषया-वर मुलाखत घेतली. या मुलाखतीचे नियोजन पुढीलप्रमाणे :-

वार = बुधवार

दिनांक = 20/2/२०१९

वेळ = सकाळी १०.०० ते ११.३० वा.

स्थळ = 'रंगलहरी कलादालन', श्रीरामपूर.

Scanned with OKEN Scanner

# मुलाखतीची कार्यवाही

मुलाखतीची कार्यवाही करताना विविध पद्धती आणि पायऱ्यांचा वापर करणे अत्यावश्यक असते कारण त्यांचा अवलंब केला तरच मुलाखत अधिक प्रभावी बनते.

यासाठी सर्वप्रथम मुलाखत देणाऱ्या व्यक्तिशी जवळीकता साधली त्यांच्याशी एकतानता निर्माण केली. त्यांच्यातील कलेची सुरुवात, तीला प्राप्त झालेली गती आणि कार्यपूर्णत्वास नेण्यास आलेल्या विविध समस्या जाणून घेतल्या.

मुलाखत घेताना सल्लार्थीचे हावभाव, तणाव यांचे काळजीपूर्वक निरिक्षण केले. उत्तरे देत असताना त्यांच्या भावना, व अभिवृत्तीचे शांतपणे श्रवण केले. प्रश्न विचारताना अगदी साध्या-सोप्या भाषेचा प्रयोग केला.

अखेरीस मुलाखतीचा योग्य समारोप साधला. मुलाखतीचे मुल्यमापन केले. मुलाखतकाराचे बोलणे योग्य प्रमाणात होते.

Scanned with OKEN Scanner

# कलाकाराने मुलाखतीस दिलेला प्रतिसाद

साळुंके नेहा = नमस्कार

भागवत रवी = नमस्कार

साळुंके नेहा = आज तुम्ही श्रीरामपूर तालुक्यातील प्रसिद्ध चित्रकार म्हणून ओळखले जातात. तर तुमची चित्रकारितेची सुरुवात कशी झाली ?

भागवत रवी = मी अगदी आठ-दहा वर्षांचा असताना घराशेजारी राहत असलेल्या भरतकुमार उदावंत यांना चित्र काढताना पाहिले होते. त्यांच्याकडे पाहूनच मला चित्रकलेची आवड निर्माण झाली.

साळुंके नेहा = व्यंगचित्र म्हणजे काय ?

भागवत रवी = राजकीय क्षेत्रातील विविध नेते, दररोज नवनवीन येणाऱ्या समाजातील समस्या इ. ची अशी चित्रे जे पाहताच चेहऱ्यावर हास्य फुलवून येईल अशाच चित्रांना व्यंगचित्रे म्हणतात.

साळुंके नेहा = चित्रकारितेकडून व्यंगचित्रकारितेचा प्रवास कसा घडला ?

भागवत रवी = व्यंगचित्र शिकावे असा काही निश्चय नव्हता परंतु आनंदासाठी मी व्यंगचित्राचे शिक्षण घेतले.

साळुंके नेहा = शिक्षण घेत असताना चित्रकलेला गती कशी प्राप्त झाली ?

भागवत रवी = दहावी नंतर, अकरावी - बारावी साठी व पुढच्या शिक्षणासाठी राव नारायण बोरावके महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयात कोणाची नेमप्लेट, कुणाचे चित्र काढून त्यातून काही पैसे मिळविण्यास सुरुवात केली. यातून मिळणारा आनंद वेगळाच होता.

साळुंके नेहा = व्यंगचित्रांचे कोणकोणते विषय निवडले ?

भागवत रवी = व्यंगचित्रांच्या माध्यमातून लोकांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करता येते हे जाणून यावर काम सुरु केले. या संग्रहात राजकीय क्षेत्रातील विविध नेत्यांची व्यंगचित्रे, हुंडाबळी, भ्रष्टाचार, पाणी बचत, वीज बचत, मुलगी वाचवा एवढेच नव्हे तर विनोदी व्यंगचित्रे अशा विविध प्रकारच्या दोन हजारांहून अधिक व्यंगचित्रांचा संग्रह साकारला आहे.

साळुंके नेहा = तुमच्या आयुष्यातील आनंद व अभिमानाच्या गोष्टी सांगा.

भागवत रवी = २०१३ मध्ये श्रीरामपूर येथे दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम आले होते

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

# कलाकाराची वैशिष्टे / शैली

<I> एपीजे अब्दुल कलाम यांचे व्यंगचित्र

दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे २०१३ मध्ये भाषण चालू असताना व्यंगचित्र काढले आहे. यात त्यांना मिसाइल मॅन म्हणून दाखविण्यात आले आहे.

<II> पाणी बचत, सामाजिक प्रश्नांवर चित्र

भागवत यांच्या संग्रहात समाजात चालू असलेल्या विविध सामाजिक विषयांवर भाष्य करणारी व्यंगचित्रे पहायला मिळतात. एका व्यंगचित्रात बेडूक पाण्याखाली, तर दुसरा बेडूक पाणी वाया जावू नये म्हणून तोटीत जावून बसला आहे. यातून पाणी वाचवण्याचा संदेश दिला आहे. शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी कुचंबणा एका व्यंगचित्रातून दाखवली आहे.

<III> विविध व्यंगचित्रांचा अनोखा संग्रह

या संग्रहात गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, शरद पवार अशा नेत्यांसह हुंडाबळी, भ्रष्टाचार, विज बचत, मुलगी वाचवा इ. व्यंगचित्रे आहेत.

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

# कलाकाराचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

(१) रवी भागवत यांचे राज्यभरातील शाळा, महाविद्यालये, कलादालने या ठिकाणी चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

(२) श्रीरामपूर तालुक्यातील चितळी येथील रक्ताच्या कर्करोग झालेल्या आठवीतील चिमुकल्याच्या मदतीसाठी तसेच खंडाळा येथील ढोकचौळे नावाच्या विद्यार्थ्याला अप्लॅस्टीक अनेमिया आजारासाठी भागवत यांनी दिवसभर चित्र काढून हजारो रुपयांची मदत केली.

(३) या त्यांच्या सामाजिक कार्यातून दोन विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुधारण्यास मदत तर झालीच त्याचबरोबर त्यांच्यात नव्याने शिक्षण घेण्याची उमेदही निर्माण झाली.

(४) रवी भागवत यांची मुलाखत घेताना त्यांनी सांगितले, " आनंदासाठी व्यंगचित्राचे शिक्षण घेतले. हाच आनंद इतरांना या माध्यमातून देणे हा उद्देश ठेवून प्रदर्शन भरवत आहे. यातून लोकांना खूप आनंद मिळतो."

Scanned with OKEN Scanner

# अन्वयार्थ

पुणे विद्यापीठ अंतर्गत बी.एड अभ्यासक्रमात विषय क्रमांक २११ मध्ये, एका चित्रकाराची मुलाखत घेतली.

(१) मुलाखत अधिक प्रभावी बनविण्यासाठी सर्वप्रथम प्रश्नावली तयार केली.

(२) मुलाखतीचे नियोजन केले या मुलाख-तीतून चित्रकाराने विद्यार्थ्यांच्या प्रगती-साठी राबवलेले उपक्रम, कार्यक्रम यांची माहिती मिळवली.

(३) शालेय अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी वसलेले कला, कौशल्ये, आवड यांना प्राधान्य देऊन त्यांची शाळेतील प्रगती वाढवता येईल याची प्रचिती आली.

(४) आनंददायी शिक्षणाला वळण देण्याचे सामर्थ्य चित्रकलेत आहे

(५) सदर मुलाखतीतून मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आविष्काराला चालना देण्याची क्षमता प्राप्त झाली.

Scanned with OKEN Scanner

# अभिप्राय

प्रात्यक्षिक कार्य क्र. २१ मध्ये श्रीरामपूर तालुक्यातील प्रसिद्ध चित्रकार रवी भागवत यांची मुलाखत घेण्याची संधी मला प्राप्त झाली.

व्यंगचित्रांच्या माध्यमातून लोकांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करता येते याची जाणीव झाली. आजच्या धावपळीच्या काळात आयुष्य जगण्यासाठीच वेळ नाही. यातच हस-ण्यासाठी हास्यक्लबला जाण्याची वेळ आली आहे. मात्र अशातच एखादा जोक चेहऱ्यावर हास्य फुलवू शकतो. यातूनच समाजातील समस्यांची जाणीवसुद्धा करून देतो.

अशाच विविध व्यंगचित्रांची निर्मिती रवी भागवत यांनी केली आहे. यातून नवीन पिढीला नक्कीच प्रेरणा मिळेल.

या मुलाखतीतून चित्रकला आणि व्यंगचित्र यांचे मानवी जीवनात असलेले महत्व समजून घेण्यास मदत झाली.

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner